PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aai
Year: 1981

Song: Divas gele mahine gele
Lyricist: Jagdish Khebudkar

दिवस गेले महिने गेले
वर्षे गेली पळून
होळी पूनवंला वयात आले
नाही आलं कळून
जीव तुम्हांवर ओवाळीन मी
नटून थटून की आले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
जिवलगा सख्या हो जिवलगा
हो लाडे लाडे बघा
तुम्हांसाठी सोळा शिणगार केले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले

मी नार नवेली शालू कोरा नवा
मी नार नवेली शालू कोरा नवा
पदरावर नक्षी बुट्टीदार चांदवा
पदरावर नक्षी बुट्टीदार चांदवा
तुमच्या आवडीचा साज राजसा
तुमच्या आवडीचा साज राजसा
गोऱ्या अंगी ल्याले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
जिवलगा सख्या हो जिवलगा
हो लाडे लाडे बघा
तुम्हांसाठी सोळा शिणगार केले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले

किती वाकून बांधू घुंगरू झाले सैल
किती वाकून बांधू घुंगरू झाले सैल
मी चोरून बघता दिला डोळ्यानं कौल
मी चोरून बघता दिला डोळ्यानं कौल
मदन पाखरू थुई थुई नाचे
मदन पाखरू थुई थुई नाचे
खेळ इश्काचा चाले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
जिवलगा सख्या हो जिवलगा
हो लाडे लाडे बघा
तुम्हांसाठी सोळा शिणगार केले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
ही शिणगाराची मैफल तुमच्यासाठी
ही शिणगाराची मैफल तुमच्यासाठी
मी सावली होऊन येईन तुमच्यापाठी
मी सावली होऊन येईन तुमच्यापाठी
तुमच्यासंगे चांद रातीला
तुमच्यासंगे चांद रातीला
मी घामानं न्हाले
कुर्बान तुम्हांवर झाले
कुर्बान तुम्हांवर झाले
जिवलगा सख्या हो जिवलगा
हो लाडे लाडे बघा
तुम्हांसाठी सोळा शिणगार केले
कुर्बान तुम्हांवर झाले

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*